FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विश्राम बाग
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0387 **Year (वर्ष):** 2025
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 28/11/2025 01:32

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7
2	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7A
3	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	12

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 27/11/2025
Time Period (कालावधी): पहर 6 **Date To (दिनांक पर्यंत):** 27/11/2025
Time From (वेळेपासून): 15:53 बजे
Time To (वेळेपर्यंत): 16:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
Date (दिनांक): 28/11/2025 **Time (वेळ):** 01:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**
Entry No. (नोंद क्र.): 003
Date & Time (दिनांक आणि वेळ): 28/11/2025 01:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भविष्य निर्वाह निधी वित्त ,विभाग जिल्हा परिषद सांगली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्धीबाहेर असल्यास):**
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): किशोरकुमार मारूती खाडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ,ब्युरो सांगली,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पता	पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ,ब्युरो सांगली,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): 91-0233-2373095

Mobile (मोबाइल नं.): 91-9420115193

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	पुजन विलास भंडारे			1. जुना स्टण्ड रोड, भोईगल्ली , कासेगाव, तावाळवा जि सांगली , विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र, भारत
2	निखील राजीव कांबळे			1. माता सावित्रीबाई फुले सोसायटी,,नांदणी रोड, मौजे संभाजीपूर,जयसिंगपूर ताशिरोळ, जिकोल्हाप,विश्राम बाग,सांगली,

				महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	नाणे आणि चलन	भारतीय- रुपया	2,000/ रू. (दोन हजार रुपये)	2,000.00

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

2,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत):

वर्दी जबाब दि. 28.11.2025

मी श्री. किशोरकुमार मारूती खाडे, वय - 35 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 9420115193

सरकारतर्फे फिर्यादी होवून देतो फिर्यादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 27/11/2025 रोजी 11.40 वा चे सुमारास मी कार्यालयात हजर असताना यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, एसीबी सांगली यांनी आम्हास बोलावून घेवून त्यांचे समोर बसले तक्रारदार श्री. संतोष यशवंत साठे, रा. म्हासोली कराड जि.सातारा यांची ओळख करून त्यांची लाच मागणीची तक्रार एकुन घेवून पुढील कारवाई करणेबाबत आदेश दिले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष साठे यांना त्यांची तक्रार कथन करण्यास सांगितली असता तक्रारदार श्री.संतोष साठे यांनी त्यांचे भविष्य निर्वाह निधी मागणीचे बिल ट्रेझरी ऑफीसला पाठविणेसाठी जिल्हा परिषद कार्यालय सांगली येथील क्लार्क श्री. पुजन भंडारी यांनी लाचेची मागणी करीत असल्याची हकीकत सांगितली. त्यानंतर मी तक्रारदार श्री.संतोष साठे यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. साठे यांनी त्यांचा लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये "मी एस.टी. स्टॅण्ड जवळ, म्हासोली, कराड, जि.सातारा येथे माझे कुटुंबासह राहण्यास आहे. मी पंचायत समिती शिराळा येथे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून नोकरीस आहे. माझा भविष्य निर्वाह निधी क्रमांक – 6289 असा आहे. माझी पत्नी सौ नयना साठे ही आजारी आहे. तिचे उपचाराकरीता मला पैशाची आवश्यकता असल्याने मी भविष्य निर्वाह निधीमधून विना परतावा 5,00,000/- रुपये मिळणे करीता गट विकास अधिकारी, पंचायत समीती शिराळा यांचेकडे अर्ज केला होता.

माझे भविष्य निर्वाह निधीमधुन विना परतावा 5,00,000/- रुपये रक्कम मागणी अर्जावरुन पंचायत समिती शिराळा प्रशासन विभागाकडू तयार केलेला प्रस्ताव क्र. पंसशि/आस्था/ 2958/2025 दि.09.10.2025 अन्वये मंजुरीकरीता मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद सांगली यांचे कार्यालयात पाठवण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद सांगली यांचेकडून क्र. जिपसां/ग्रापं/आस्था-4/ 6214/2025 दि. 19.11.2025 अन्वये प्रस्तावास मंजुरी देण्यात आली होती. सदर मंजुरी आदेशाची प्रत पंचायत समिती शिराळा येथे प्राप्त झाली होती.

त्याप्रमाणे पंचायत समिती शिराळा प्रशासन विभागाकडून जा.क्र. पसशि/ आस्था/ 3237/ 2025 दि.

20.11.2025 अन्वये भविष्य निर्वाह निधी क्रमांक – 6289 मधुन ना परतावा 5,00,000/- रुपये रक्कम मिळणे बाबतचे देयक तयार करुन मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचे कार्यालयात जमा करणेसाठी माझ्याकडे देण्यात आले होते. सदर देयक मी दि.21.11.2025 रोजी मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचे कार्यालयात जमा करुन पोहच घेतली व भविष्य निर्वाह निधी टेबलचे काम पाहणारे पूजन भंडारी वरिष्ठ सहाय्यक लेखा यांची भेट घेवुन त्यांना पत्नीचे उपचाराकरीता पैशाची आवश्यकता असल्याचे सांगुन देयक रक्कम लवकर अदा करणे बाबत विनंती केली. त्यावेळी पूजन भंडारी यांनी लवकर भविष्य निर्वाह निधी रक्कम देण्यासाठी माझ्याकडे लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझे पत्नीचा दवाखान्याचा खर्च आहे. त्याकरीता मी भविष्य निर्वाह निधीमधून रक्कम काढत आहे असे सांगून सहकार्य करण्यास सांगीतले. तेंव्हा ते पैशा शिवाय सहकार्य होत नाही असे म्हणाले.

मी माझे भविष्य निर्वाह निधी क्रमांक – 6289 मधुन ना परतावा 5,00,000/- रुपये रक्कम मिळणे बाबतचे देयक मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचे कार्यालयात दि.21.11.2025 रोजी जमा केले आहे. परंतु अद्याप 5,00,000/- रुपये रक्कम मला मिळालेली नाही. पूजन भंडारे हे माझ्याकडून काही तरी लाच रक्कम घेतल्या शिवाय माझे भविष्य निर्वाह निधी क्र. 6289 मधुन ना परतावा 5,00,000/- रुपये मागणी केलेली रक्कम मंजुर करुन मला देणार नाहीत याची मला खात्री झाली आहे.

आज रोजी मी मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचे कार्यालयात जावुन पूजन भंडारी वरिष्ठ सहाय्यक लेखा जिल्हा परिषद सांगली यांची भेट घेवुन त्यांना भविष्य निर्वाह निधी रक्कम लवकर देणे बाबत विनंती करणार आहे. पूजन भंडारी हे लाचेची मागणी करतील याची मला खात्री आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझेत व श्री पूजन भंडारी यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार अगर आपआपसात कोणताही भांडणतंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती." अशी हकीकत नमूद आहे. त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली.

त्यानंतर मी लागलीच मा. उपप्रादेशीक मोटर परिवहन अधिकारी सांगली यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विनंती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना एसएफसी मॉल सांगली येथील पार्किंगचे बाजूस हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष साठे यांनी एसएफसी मॉल सांगली चे पार्किंगचे बाजूस जावून थांबणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.साठे हे त्यांचेकडील मो.सा.क्र. एमएच 50 एक्स 6949 वरून रवाना झाले. त्यानंतर मी, पोना/प्रितम चौगुले, सपोफौ/उमेश जाधव असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अंथ्रासिन पावडर, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन खाजगी हुंडाई क्रेटा वाहन क्र. एमएच 11 सीक्यु 9496 मधून व पोह/सलिम मकानदार, पोकॉ/अजित पाटील, पोकॉ/चंद्रकांत जाधव त्यांचेकडील स्विफ्ट कार क्र.एमएच 10 सीएक्स 9096 मधून कार्यालयातून 12.50 वा चे सुमारास रवाना होवून एसएफसी मॉल सांगली येथील कार पार्किंगचे बाजुस 13.00 वा चे सुमारास दाखल झाले. तक्रारदार हे सदर ठिकाणी हजर होते. त्यानंतर मी तक्रारदार श्री.साठे यांनी आमचेकडील वाहनामध्ये येवून बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.साठे हे आमचेकडील क्रेटा वाहनामध्ये बसले.

त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पंच श्री.वैभव पाटील, व श्रीमती धनश्री माळी हे 13.05 वा चे सुमारास एसएफसी मॉल सांगली येथे आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी दोन्ही पंचांना एक लोकसेवकाविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष साठे यांना दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. वैभव वसंतराव पाटील यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. धनश्री बाबासो माळी यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. साठे यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांचे भविष्य निर्वाह निधीचे बिल ट्रेझरी ऑफीसला पाठविणेसाठी श्री.पुजन भंडारी, क्लार्क जिल्हा परिषद सांगली यांनी त्यांचेकडे लाचेची मागणी करीत असल्याची हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष साठे यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करुन तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन श्री. पुजन भंडारी, क्लार्क जिल्हा परिषद सांगली यांचेविरुध्द

लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोकॉ/अजित पाटील यांनी त्यांचेकडील कॅमेरा दोन्ही पंचांना व तक्रारदार यांना दाखवून त्याची माहिती देवून कॅमेरामध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही व्हिडीओ चित्रीकरण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर मी 13.32 वा चे सुमारास माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये व पोकॉ/पाटील यांनी त्यांचेकडील कॅमेरामध्ये निवेदन रेकॉर्ड केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष साठे व पंच क्र.1 वैभव पाटील यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.49 वा सुरु करुन तक्रारदार श्री. संतोष साठे यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून तक्रारदार व पंच नं.1 वैभव पाटील यांना श्री. पुजन भंडारी यांची जिल्हा परिषद सांगली येथे भेट घेणेकामी रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. संतोष साठे हे त्यांचेकडील हिरो मो.सा. क्र. एमएच 50 एक्स 6949 वरून पंच नं.1 वैभव पाटील यांचेसह रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. संतोष साठे व पंच नं.1 वैभव पाटील असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 14.53 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. वैभव पाटील यांना, श्री. पुजन भंडारी यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा. वरून रवाना होवून जिल्हा परिषद सांगली येथे दाखल झालो. तेथे आम्ही मो.सा. पार्क करून पहिल्या मजल्यावरील भविष्य निर्वाह निधी, वित्त विभाग, जिल्हा परिषद सांगली येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी तेथील कर्मचारी यांना पुजन भंडारी यांचेबाबत विचारणा केली असता पुजन भंडारी हे जेवण्यास गेले असल्याने तक्रारदार व मी असे कार्यालयाचे खाली येवून थांबून राहिलो. त्यावेळी तक्रारदार श्री. संतोष साठे यांनी पुजन भंडारी यांना कॉल करून विचारणा केली असता पुजन भंडारी यांनी ते बाहेरच असल्याचे सांगून थोडया वेळाने येतो असे म्हणाले. म्हणून आम्ही पुजन भंडारी यांची येण्याची वाट पाहिली. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व मी असे पहिल्या मजल्यावरील भविष्य निर्वाह निधी, वित्त विभाग येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार हे कार्यालयातील एका टेबलाजवळ बसले इसमाजवळ जावून त्यांचेशी त्यांचे बिला संदर्भात चर्चा करू लागले. त्यावरून सदरचे इसम हे श्री.पुजन भंडारी असल्याची माझी खात्री झाली. त्यावेळी कार्यालयातील आणखीन एक इसम देखील तक्रारदार व पुजन भंडारी यांचे चर्चेत सहभाग घेवून तक्रारदार यांचेशी चर्चा करू लागले.

त्यानंतर तक्रारदार व पुजन भंडारी व कार्यालयातील अनोळखी इसम व मी असे चौघे कार्यालयातून खाली येवून कार्यालयाचे गेट जवळील चहाचे टपरीजवळ आलो. त्यावेळी पुजन भंडारी, तक्रारदार श्री.संतोष साठे व अनोळखी इसम असे तक्रारदार यांचे बिला संदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी पुजन भंडारी यांनी तक्रारदार यांना त्यांचे बिलावर वरिष्ठ अधिकारी यांच्या सहया घेवून बिल ट्रेझरी ऑफीसला पाठविणे संदर्भात चर्चा केली. त्यानंतर पुजन भंडारी यांनी तक्रारदार यांना हाताने पैशाबाबत इशारा करून "किती काय?" असे विचारले असता तक्रारदार यांनी त्यांना "किती सांगा तुम्ही...तुमच्या हयान सांगा" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक पुजन भंडारी यांनी "अडीच हजार रुपये" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 2,500/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना "अडीच हजार.....एटीएम मधून काढून घेवू....फोन पे करून का गुगल पे?" अशी विचारणा केली. त्यावर पुजन भंडारी यांनी "काढून या की.....आयडीबीआय बँकेचे एटीएम न्हाय काय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी पुजन भंडारी यांना "अड यांना "अडीच हजार रूपये होईल ना?" असे विचारले असता पुजन भंडारी यांनी "शंभर टक्के" असे म्हणाले. त्यावर अनोळखी इसम यांनी तक्रारदार यांना "प्रयत्न करतोय....ट्रेझरीत कस हाय पे रजिष्ट्रेशन अँप्रुव्हल करून पण त्याच्याकडन पैसे घेत्यात ते काय फुकट करत न्हाय, लक्षात ठेवा आमची काम" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री.पुजन भंडारी व अनोळखी इसम यांना त्यांचे बिल लवकर पाठविणेची विनंती केली असता लोकसेवक पुजन भंडारी व अनोळखी इसम यांनी "अँप्रुव्हल आजच्या आज देतो" असे म्हणाले.

त्यानंतर तक्रारदार साठे यांनी पुजन भंडारी व अनोळखी इसम यांना रक्कम कमी करणेची विनंती केली असता लोकसेवक श्री.पुजन भंडारी यांनी पुन्हा तक्रारदार यांचेकडे "अडीच हजार रूपये" असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार श्री.साठे यांनी पुजन भंडारी यांना "पाचशे रूपये कमी करणेची विनंती केली" त्यावर अनोळखी इसम यांनी तक्रारदार यांना "बर द्या....बर करा" असे म्हणून "अडीच हजार रूपये मधील पाचशे रूपये कमी करून

"या आवरून लवकर या" असे म्हणून तक्रारदार यांना लाच देणेस प्रोत्साहन दिले व लागलीच लाच रक्कम 2,000 /- रूपये आणुन देण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार व मी असे जिल्हा परिषद सांगलीचे समोरील असले आयडीबीआय बँकेचे एटीमध्ये जावून पैसे काढणेचे नाटक करून पुन्हा पुजन भंडारी यांचेजवळ येवून तक्रारदार यांनी त्यांना एटीएम बंद असल्याचे सांगून दहा-पंधरा मिनीटात पैसे आणुन देतो असे म्हणाले. त्यावर पुजन भंडारी यांनी "वर या....वरती ओसी काढून ठेवतो" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व मी जिल्हा परिषद सांगली येथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष साठे यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.1 वैभव पाटील यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगून आणखीन हकीकत सांगितली की, त्यांचे सोबत चर्चा करणारे अनोळखी इसम हे श्री.निखील कांबळे, कनिष्ठ लिपीक असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. संतोष साठे व लोकसेवक श्री. पुजन भंडारी व श्री.निखील कांबळे यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाई मध्ये, लोकसेवक श्री. पुजन भंडारी यांनी तक्रारदार श्री.संतोष साठे यांचे भविष्य निर्वाह निधी मधील 5,00,000/- रूपये रक्कम काढण्याकरीता, सदर मंजूर प्रस्तावाचे बिलावर वरिष्ठ अधिकारी लेखा विभाग जिल्हा परिषद सांगली यांच्या सहया घेवून बिल ट्रेझरी ऑफीस येथे पाठविण्याकरीता तक्रारदार यांचेकडे 2,500/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 2,000/- रूपये लाचेची मागणी केली व लोकसेवक श्री. निखील कांबळे यांनी तक्रारदार श्री.संतोष साठे यांचेशी त्यांचे बिला संदर्भात चर्चा करून तक्रारदार यांनी लाच रक्कम पुजन भंडारी यांना देणेकरीता प्रोत्साहन दिले असल्याचे निष्पन्न झाले.

श्री. पुजन भंडारी यांनी तक्रारदार यांना पैसे घेवून येण्यास सांगितले असल्याने लागलीच श्री. पुजन भंडारी व निखील कांबळे यांचेविरूध्द जिल्हा परिषद सांगली येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे आम्ही सर्वानुमते निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष साठे यांना श्री. पुजन भंडारी यांनी लाच मागणी केलेप्रमाणे 2,000/- रूपये रक्कम हजर करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचेकडील 500/- रूपये दराच्या एकुण 4 नोटा असे 2,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यावेळी मी सापळा पथकातील अंमलदार सलीम मकानदार यांचेकरवी लाच रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतल्या. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोह/मकानदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन 2,000/- रूपयांचा नोटांची घडी करून तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष साठे, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी पथकातील पोह/मकानदार यांना एसएफसी मॉल सांगली येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.

त्यानंतर मी 15.43 वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये व पोकॉ/पाटील यांनी व्हिडीओ कॅमेरामध्ये रेकॉर्ड केले.

त्यानंतर मी, तक्रारदार व पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचेकडील कॅमेरामध्ये लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री. पुजन भंडारी यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर कार्यालयाचे बाहेर येवून त्यांचे डोक्याची टोपी काढून डोक्यावरून हात फिरवून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.53 वाजता सुरू करून लेसचे सहाय्याने तक्रारदार यांचे गळयात अडकवला. त्यानंतर मी, तक्रारदार व पंच नं. 1 वैभव पाटील यांना श्री पुजन भंडारी यांची जिल्हा परिषद सांगली

येथे भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. संतोष साठे व पंच नं. 1 श्री.वैभव पाटील असे तक्रारदार यांचेकडील मो.सा. वरून रवाना झाले.
त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 श्री. धनश्री माळी, पोना/प्रितम चौगुले, सपोफौ उमेश जाधव असे सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य घेवून माझेकडील हुंडाई क्रेटा वाहनामधून व पोकॉ/पाटील, पोकॉ/चंद्रकांत जाधव असे त्यांचेकडील स्विफ्ट कार मधून रवाना झालो. मी दिले सुचनेप्रमाणे पोह/मकानदार हे एसएफसी मॉल सांगली येथे सुटकेससहीत थांबून राहीले.

तक्रारदार श्री. संतोष साठे व पंच नं. 1 श्री. वैभव पाटील हे मो.सा वरून पुढे आणि मी व सापळा पथक असे आमचेकडील खाजगी वाहनाने त्यांचे पाठोपाठ रवाना झालो. तक्रारदार यांनी त्यांची मो.सा. कॉग्रेंस भवन, राममंदीर चौक मार्गे जिल्हा परिषद सांगली कार्यालयाचे आतील पार्किंगमध्ये जावून मो.सा. पार्क केली. लागलीच मी व सापळा पथक असे आमचेकडील कारने तक्रारदार व पंच थांबले ठिकाणापासून काही अंतरावर वाहने पार्क केली. त्यावेळी तक्रारदार यांनी कोणास तरी फोन केलेचा दिसले. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 असे जिल्हा परिषद सांगली कार्यालयाचे आतमध्ये गेलेचे दिसले. लागलीच मी, पंच नं.2 माळी व सापळा पथक असे आमचेकडील वाहनामधून खाली उतरून तक्रारदार यांचे पाठोपाठ गेलो. तक्रारदार व पंच नं.1 वैभव पाटील हे कार्यालयाचे पहिल्या मजल्यावरील भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग येथे गेलेचे दिसले. लागलीच मी, पंच नं.2 माळी व सापळा पथक असे कार्यालयाचे पहिल्या मजल्यावर कोणास संशय येणार नाही अशा रितीने आजु-बाजुस सापळा लावून थांबून राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. संतोष साठे भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग येथून बाहेर येवून त्यांचे डोक्यावरील टोपी काढून डोक्यावरून हात फिरवून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला.

लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे पोना/चौगुले यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.05 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या. लागलीच पंच नं.2 माळी व सापळा पथक असे भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग येथे कार्यालयात दाखल झालो. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोकॉ/पाटील यांनी त्यांचेकडील कॅमेरामध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले.

त्यावेळी मी पुजन भंडारी यांना ताबेत घेवून तेथे हजर असलेल्या पंच नं.1 वैभव पाटील यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता पंच नं.1 पाटील यांनी लोकसेवक श्री.पुजन भंडारी यांनी 2,000/- रूपये लाच रक्कम त्यांचे डावे हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजूचे खिश्यामध्ये ठेवली असल्याचे सांगितले. तसेच मी पुजन भंडारी यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी रक्कम पॅन्टचे डाव्या बाजुचे पाठीमागील खिश्यामध्ये ठेवली असल्याचे सांगितले. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे सपोफौ/उमेश जाधव यांनी लोकसेवक श्री.पुजन भंडारी यांचे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे तपासणी केली असता त्यामध्ये 500/- रूपये दराच्या नोटा मिळून आल्याने सदरची रक्कम पंच नं.2 माळी यांचेकडे तपासणी करीता दिली. त्यानंतर पंच नं.2 माळी यांनी सदर रक्कमेची तपासणी केली असता त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 4 नोटा असे 2,000/- रूपये मिळून आले. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पंच नं.2 माळी यांनी लाच रक्कमेची पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळा कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे खात्री केली. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्री. माळी यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली. त्यानंतर मी लोकसेवक श्री. पुजन भंडारी यांना माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.

त्यानंतर मी लोकसेवक श्री पुजन भंडारी यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. पुजन विलास भंडारे, वय -31 वर्षे, व्यवसाय - नोकरी, वरिष्ठ सहाय्यक लेखा, वर्ग-3, भविष्य निर्वाह निधी विभाग जिल्हा परिषद सांगली, रा. जुना स्टॅण्ड रोड, भोईगल्ली कासेगाव, ता.वाळवा जि. सांगली, मो.नं. 7507729496 असे असल्याचे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक यांचे नाव भंडारी नसून भंडारे असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या हया भविष्य निर्वाह निधी विभाग जिल्हा परिषद सांगली येथे पुर्ण केल्या आहेत. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील कॅमेरामध्ये चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर मी श्री.निखील कांबळे यांना अंमलदार पोना/चौगुले यांचेकरवी ताबेत घेवून त्यांना त्याचे नाव गाव विचारले असता निखील कांबळे यांनी त्यांचे नाव श्री. निखील राजीव कांबळे, वय-35 वर्षे, व्यवसाय - नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, वर्ग-3, भविष्य निर्वाह निधी विभाग जिल्हा परिषद सांगली, रा. माता सावित्रीबाई फुले सोसायटी, नांदणी रोड, मौजे संभाजीपूर, जयसिंगपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर, मो.नं.8999155374 असे असल्याचे सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. संतोष साठे यांचे भविष्य निर्वाह निधी प्रकरणातील आवश्यक कागदपत्राबाबत लोकसेवक श्री. पुजन भंडारे यांना विचारणा केली असता पुजन भंडारे यांनी त्यांचे टेबलवर ठेवलेले तक्रारदार श्री. संतोष साठे यांचे भविष्य निर्वाह निधीच प्रस्ताव, बिल व त्यासंबंधीत रजिष्टर आमचे समक्ष हजर केलेने सदरची

कागदपत्रे व रजिष्टर आम्ही ताबेत घेतली.

त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री.पुजन भंडारे व श्री.निखील कांबळे यांना ताबेत घेवून आमचेकडील वाहनाने जिल्हा परिषद सांगली येथून 16.50 वा चे सुमारास रवाना होवून अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे 17.00 वा चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं. 1 श्री. वैभव पाटील यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मो.सा. वरून एसएफसी मॉल सांगली येथून रवाना होवून काँग्रेस भवन, राममंदीर चौक मार्गे जिल्हा परिषद सांगली येथे दाखल झालो. त्यानंतर आम्ही मो.सा. कार्यालयाचे पार्किंगमध्ये पार्क केली. त्यावेळी तक्रारदार श्री.संतोष साठे यांनी लोकसेवक श्री.पुजन भंडारे यांना कॉल करून त्यांना कार्यालयाचे खाली आलो असल्याचे सांगून खाली येता का वर येवू? अशी विचारणा केली असता पुजन भंडारे यांनी तक्रारदार यांना वर ऑफीसमध्ये बोलविले. त्यानंतर तक्रारदार व मी असे पहिल्या मजल्यावरील भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग कार्यालयात पुजन भंडारे यांचेजवळ गेलो. त्यावेळी तकारदार श्री. संतोष साठे यांनी पुजन भंडारे यांची भेट घेवून त्यांचेशी चर्चा करू लागले. त्यावेळी तक्रारदार यांनी श्री.पुजन भंडारे यांना त्यांचे बिल लवकर पुढे पाठविणेची विनंती केली. त्यावर पुजन भंडारे यांनी "शंभर टक्के.... मी आता जाणार करायला" असे म्हणाले. त्यावेळी पुजन भंडारे यांने तक्रारदार यांचेकडे हाताने इशारा करून लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी "इथच" असे म्हणाले असता पुजन भंडारे यांनी होकारार्थी मान डोलावल्याने तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये अ◌ॅथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने बाहेर काढून श्री.पुजन भंडारे यांचेसमोर धरली असता पुजन भंडारे यांनी लाच रक्कम त्यांचे डावे हाताने स्विकारून त्यांचे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली" वगैरे हकीकत पंच नं.1 पाटील यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. संतोष साठे यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.1 वैभव पाटील यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली.

त्यानंतर पुढील कार्यवाही अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सांगली येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 27.11.2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. पुजन विलास भंडारे, वय -31 वर्षे, व्यवसाय - नोकरी, वरिष्ठ सहाय्यक लेखा, वर्ग-3, यांनी भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग जिल्हा परिषद सांगली येथे स्वत:चा पदाचा गैरवापर करून सार्वजनिक कर्तव्य अप्रामाणिकपणे पार पाडण्याच्या उद्देशाने तक्रारदार यांचे भविष्य निर्वाह निधी मधील मंजूर 5,00,000/- रूपये रक्कम काढण्याकरीता स्वत:चे पदाचा प्रभाव वापरून सदर मंजूर प्रस्तावाचे बिलावर वरिष्ठ अधिकारी लेखा विभाग जिल्हा परिषद सांगली यांच्या सहया घेवून बिल ट्रेझरी ऑफीस येथे पाठविण्याकरीता स्वत:करीता तक्रारदार यांचेकडे 2,500/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 2,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच लोकसेवक श्री.निखील राजीव कांबळे, वय-35 वर्षे, व्यवसाय - नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, वर्ग-3, भविष्य निर्वाह निधी विभाग जिल्हा परिषद सांगली यांनी तक्रारदार व श्री.पुजन भंडारे यांचे लाच मागणी चर्चेमध्ये सहभागी होवून लोकसेवक श्री.पुजन भंडारे यांनी मागितलेली लाच रक्कम देण्याकरीता तक्रारदार यांना प्रोत्साहन दिले असल्याचे निष्पन्न झाले. व लोकसेवक पुजन भंडारे व निखील कांबळे यांनी तक्रारदार यांचे काम करून देणेची हमी दिली.

त्यानंतर लागलीच श्री.पुजन भंडारे यांचेविरूध्द सापळा कारवाई केली असता, सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री. पुजन विलास भंडारे, वय -31 वर्षे, व्यवसाय - नोकरी, वरिष्ठ सहाय्यक लेखा, वर्ग-3, यांनी भविष्य निर्वाह निधी वित्त विभाग जिल्हा परिषद सांगली येथे आपले स्वत:चा पदाचा गैरवापर करून सार्वजनिक कर्तव्य अप्रामाणिकपणे पार पाडण्याच्या उद्देशाने स्वत:करीता तक्रारदार यांचेकडून 2,000/- रूपये लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणून माझी लोकसेवक 1) श्री. पुजन विलास भंडारे, वय -31 वर्षे, व्यवसाय - नोकरी, वरिष्ठ सहाय्यक लेखा, वर्ग-3, भविष्य निर्वाह निधी विभाग जिल्हा परिषद सांगली, रा. जुना स्टॅण्ड रोड, भोईगल्ली कासेगाव, ता.वाळवा जि. सांगली व लोकसेवक 2) श्री. निखील राजीव कांबळे, वय-35 वर्षे, व्यवसाय - नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, वर्ग-3, भविष्य निर्वाह निधी विभाग जिल्हा परिषद सांगली, रा. माता सावित्रीबाई फुले सोसायटी, नांदणी रोड, मौजे संभाजीपूर, जयसिंगपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7, 7 अ व 12 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SUDHIR GULCHAND BHALERAO(I (Inspector)) / **or** (किंवा)
PSMH26817

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Kishorkumar Khade PI. ACB Sangli

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफिसर,
विश्रामबाग पोलीस स्टेशन सांगली

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): SUDHIR GULCHAND
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PSMH26817